# तुळाजी आंग्रे

## एक 'विजयदुर्ग'



श. श्री. पुराणिक

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

# तुळाजी आंग्रे
# एक ' विजयदुर्ग '

श. श्री. पुराणिक

चंद्रकला
प्रकाशन

चंद्रकला प्रकाशन : १३२

**प्रकाशिका**
सौ. शशिकला उपाध्ये
१३८, कसबा पेठ,
पुणे - ४११ ०११.

© श. श्री. पुराणिक

**प्रथमावृत्ती**
ऑक्टोबर १९९९

**मुखपृष्ठ**
चंद्रमोहन कुलकर्णी

**मुखपृष्ठ व आतील छपाई**
जंगम कलामुद्रण, २५/१०, नांदेड फाटा,
सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१.

**अक्षरजुळणी**
पॅम आर्टस् ॲण्ड प्रिंट
सौ. पद्मिनी रुईकर
१३९५, कसबा पेठ, पुणे ४११ ०११.

मूल्य रु. २८०/-

मातृचरणी

# प्रस्तावना

## एक दुर्घट साहस

मराठ्यांच्या इतिहासातील तुळाजी आंग्रे याच्या भीषण आणि दारुण शोकांतिकेचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न करणे, म्हणजे तीनशे वर्षांपूर्वी तुरुंगात लक्ष्यार्थाने जिवंत गाडल्या गेलेल्या दुर्दैवी माणसाच्या अवशेषांचे उत्खनन करण्यासारखे आणि तीनशे वर्षांपूर्वी, ज्याला प्रायश्चित्त नाही आणि ज्याला परिमार्जन नाही, अशा घडून गेलेल्या अभूतपूर्व राष्ट्रीय प्रमादाचा छडा लावण्यासारखे दुर्घट; आणि जवळ जवळ असाध्य असे साहस आहे. कारण, मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधनाला दीडशे वर्षे होऊन गेलेली असली, आणि थोरला बाजीराव, चिमाजी आप्पा, बाळाजी विश्वनाथ, नानासाहेब, थोरला माधवराव, महादजी शिंदे, नाना फडणीस, आहिल्याबाई होळकर इत्यादी पेशवाईतल्या स्त्री - पुरुषांची कमी अधिक विस्तृत चरित्रे प्रसिद्ध झालेली असली, तरी खुद्द तुळाजी आंग्रे याचे मात्र एकही चरित्र प्रसिद्ध झालेले पाहण्यात नाही. नाही म्हणावयाला, वि. वा. हडप यांनी मात्र आपल्या 'कादंबरीमय पेशवाई' या मालेतील 'पेशवाईचे दिव्य तेज' या कादंबरीत तुळाजी आंग्र्याचा अस्त याच विषयाचा परामर्श घेतलेला आहे. सरदेसाई यांची 'मराठी रियासत' बाळाजी विश्वनाथ, बाजीराव, नानासाहेब, (म. वि. २), पानिपत प्रकरण (म. वि. ३), पेशवा माधवराव (म. वि. ४) त्याचप्रमाणे ढबू यांचे 'कुलाबकर आंग्रे' डॉ. बी. के. आपटे यांचे 'Maratha Navy and Merchantship.' प्रो. पांडुरंग पिसुर्लेकर यांचे 'पोर्तुगेज मराठा संबंध' प. रा. दाते यांचे 'कान्होजी आंग्रे यांचे चरित्र', 'पेशवे दप्तर' - खंड ३, २४, व ३३ या ग्रंथांत कान्होजी, सेखोजी, मानाजी, संभाजी व तुळाजी या आंग्रे घराण्यातील व्यक्तींबद्दल पुष्कळच महत्त्वाची माहिती आलेली आहे. तरीही ती पुरेशी नाही. कारण, या प्रकरणाचा सर्वसूत्रधार असलेला पेशव्यांचा कल्याणचा सुभेदार रामाजी महादेव बिवलकर याच्याबद्दल या सर्व ग्रंथांत फारच थोडी माहिती आहे. त्याचे जीवन व कार्य यांची तपशीलवार माहिती अवगत झाल्याशिवाय या साऱ्या प्रकरणाचा ग्रंथ लागणेच शक्य नाही अशी माझी खात्री झाल्यावर त्या दिशेने मी बहुत प्रयत्न केला. अखेर आमच्या येथील 'बालविकास' शाळेच्या ग्रंथालयात अचानक एका कपाटाच्या कप्प्यात, कल्याणचे संशोधक विवेकानंद गोडबोले यांचे 'सुभे कल्याण' हे पुस्तक माझ्या हाती लागले आणि माझा आनंद गगनात मावेना.

जन्मांधाला दृष्टिलाभ व्हावा आणि त्याच्यापुढे महानिधी प्रकट व्हावा तसे झाले. कारण, या ग्रंथात पान १५९ ते १९२ या चौतीस पानांत रामाजी महादेवाचे साधार आणि सविस्तर चरित्र मला वाचावयास मिळाले. या सर्व साहित्याचा कसोशीने अभ्यास केल्यावर या पेशवे - आंग्रे संघर्षाचे स्वरूप करतलावरच्या आवळ्याप्रमाणे माझ्या डोळ्यांपुढे स्पष्ट उभे राहिले. त्याची मी उपपत्ती बसवू शकलो, अन्वयार्थ लावू शकलो आणि काही निष्कर्षही काढू शकलो. हा अन्वयार्थ आणि हे निष्कर्ष हाच या ग्रंथाचा गाभा आहे.

## या ग्रंथातील निष्कर्ष

माझे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत - १) आंग्रे - पेशवे संघर्ष हा मूलतः सत्तासंघर्ष होता. २) पेशव्यांना कोकणात सत्ता कोकणस्थ ब्राह्मणांचीच असली पाहिजे अशी महत्वाकांक्षा होती. पेशव्यांच्या या प्रवृत्तीचे वर्णन सरदेसायांनी 'पेशव्यांची कोकणभूमीची आसक्ति' व खरेशास्त्र्यांनी 'जात्यभिमानाची प्रेरणा' या शब्दांत केले आहे. ३) आंग्रे हे पेशव्यांच्यापूर्वी पाचशे वर्षे म्हणजे सन १२०० पासून कोकणात स्थिरपद झाले होते, व सुवर्णदुर्गावर राज्य करीत होते. ४) ही प्राचीन सत्ता उखडून काढण्यासाठी बाळाजी विश्वनाथ, बाजीराव व नानासाहेब यांनी पद्धतशीर प्रयत्न केले. बाळाजी विश्वनाथाने कान्होजीला ताराबाईपासून फोडून शाहूकडे आणले, बाजीरावाने आंग्र्यांच्या दौलतीची फाळणी केली व इंग्रज, फिरंगी यांच्याशी आंग्र्यांविरुद्ध तह केला आणि नानासाहेबाने रामाजी महादेवाच्या मार्फत इंग्रजांशी संयुक्त मोहिमेचा करार करून तुळाजीचा शेवट केला. ५) पेशव्यांच्या हातून स्वकीयांविरुद्ध इंग्रजांची मदत घेण्याचा हा जो प्रमाद झाला, त्याचे मूलभूत कारण म्हणजे रामचंद्रपंत अमात्याच्या 'आज्ञापत्रा'त वर्णिलेल्या शिवकालीन राजनीतीचे व आरमारनीतीचे त्यांना संपूर्ण विस्मरण झाले होते. ६) या स्वारीच्या समर्थनार्थ तुळाजीवर i) सरकार देणे न देणे, ii) रयतेवर जुलूम करणे व iii) ब्राह्मणद्वेष असे तीन आरोप करण्यात आले आहेत. यांतला पहिला आरोप पुराव्यानिशी सिद्ध होतो, पण पुढील दोन्ही आरोपांना पुरावा नाही, उलट पुरावा आहे तो नेमका उलट आहे. ७) तुळाजीला मुलामाणसांसह पेशव्याने आमरण कैदेत डांबले. त्यात पेशव्याचा दुष्टपणा किंवा खुनशीपणा नसून तो शुद्ध राजकीय सुरक्षिततेचा व्यवहार होता. तुळाजीला ठार मारणे हे 'मराठियांच्या राज्यांत तो दगा

होणार नाहीं ' अशा मराठ्यांच्या राजनीतीत बसत नव्हते. उलट, त्याला मोकळा सोडला तर तो जंजिऱ्याचा सीदी किंवा हैदर यांना मिळून राज्यावर संकट आणण्याची रास्त भीती पेशव्यांना होती. त्यामुळे त्याला मोकळा न सोडता कैदेत ठेवणे यापलीकडे पेशव्यांना पर्यायच नव्हता.

## पेशवे - चित्पावन प्रशस्ती

माझे हे सारे निष्कर्ष पेशव्यांना प्रतिकूल आहेत हे उघडच आहे; पण म्हणून एकदम दुसऱ्या टोकाला जाऊन पेशव्यांनी जे जे केले ते ते 'अपराधी जन चुकतचि गेले' या न्यायाने चूकच केले असे समजणेही बरोबर नाही. पेशव्यांच्या उणीवांप्रमाणे त्यांचे गुणही मोठेच होते. सन १७१३ पासून सन १८१८ पर्यंत शंभर वर्षे पेशव्यांनीच मराठशाही टिकवून धरली. त्यांच्याच कारकीर्दीत अटकेवर झेंडे फडकले, पानिपतची गौरवगाथा घडली, दिल्लीचा बादशहा मराठ्यांचा पेन्शनर झाला. बुंदेलखंडाचे रोहिलखंड आणि केरळचा पूर्वबंगाल होण्याची आपत्ती टळली. उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत आणि पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत म्लेंच्छांचे बंड मोडून काढण्यात आले. आजचा बृहन्महाराष्ट्र ही पेशव्यांची कमाई आहे; आंग्रे प्रकरणाचा अपवाद सोडला तर पेशव्यांनी कोठेही जातीचा अभिमान धरलेला नाही; त्यांच्या कारकीर्दीत शेकडो नवी घराणी सर्व जातींतून उदयास आली. वस्तू नसली म्हणजे तिची किंमत कळते या न्यायाने मराठ्यांच्या इतिहासातून पेशवे आणि पेशवाई वजा करावी व काय राहते हे पाहावे, म्हणजे पेशव्यांच्या कर्तृत्वाची इयत्ता ध्यानात येऊं शकेल. या सर्व गोष्टी नजरेआड करणे ही केवळ कृतघ्नताच नव्हे, तर तो इतिहासाचा आणि इतिहासातील सत्याचाही अपलाप आहे.

जी गोष्ट पेशव्यांबद्दल तीच त्यांच्या चित्पावन जातीबद्दल. चित्पावनांना अभिमान वाटावा इतकेच नव्हे, तर इतरांनाही त्यांच्याबद्दल आदर वाटावा असे गुण त्यांच्यात पुष्कळच आहेत. पुण्याला विद्येचे माहेरघर व संस्थांचे शहर बनविण्यात चित्पावनांचा वाटा फारच मोठा आहे. स्वार्थत्याग, देशभक्ती, चारित्र्य, विद्येची उपासना, साहित्य आणि कला यांची जोपासना या सर्व बाबतीत, त्यांनी रानडे, टिळक, गोखले, राजवाडे, खरे, केळकर, माटे, डॉ. केतकर, चाफेकर, वासुदेव बळवंत फडके, हरिभाऊ आपटे, शिवरामपंत परांजपे, खाडिलकर, सावरकर,

कोल्हटकर अशी डोंगराएवढ्या कर्तृत्वाची माणसे निर्माण केलेली आहेत. असे हे चित्पावनांचे कुल ही राष्ट्राची अमोल संपत्ती समजली पाहिजे. या ग्रंथातले निष्कर्ष पेशव्यांना आणि त्यांनी अभिमान धरलेल्या त्यांच्या चित्पावन जातीला बव्हंशी प्रतिकूल आहेत हे खरे असले तरी, 'नमे द्वेष्योऽस्ति न मे प्रिय:' या न्यायाने त्यात वैयक्तिक रागद्वेषांचा काही भाग आहे, असा जाणून किंवा नेणून, स्वत:चा किंवा दुसऱ्याचा गैरसमज करून घेणे ही आत्मवंचना ठरेल; तशी आत्मवंचना आणि परवंचना करून घेतली जाऊ नये यासाठी मुद्दाम हे स्पष्टीकरण करावे लागले. व्यक्तीच्या किंवा जातीच्या, अभिमानाने किंवा द्वेषाने, इतिहास किंवा चरित्र लिहिण्यास प्रवृत्त होणारा माणूस त्या प्रमाणात इतिहास किंवा चरित्र लिहिण्यास अपात्र समजावा, हे खरे असले तरी, जातीच्या प्रेरणा इतिहासात बरे - वाईट कार्य करीत असल्याचे निदर्शनास आले, तर त्यांच्याकडे डोळेझाक करणे, किंवा त्यांचा उल्लेख न करणे, किंवा त्यांच्या बाबतीत सारवासारव करणे, हे बौद्धिक प्रामाणिकपणाचे तर लक्षण नाहीच नाही; इतकेच नव्हे तर, सत्य संशोधन हाच आत्मा असलेल्या इतिहासाशीही ती प्रतारणा ठरेल, हेही लक्षात घेणे जरूर आहे.

## ऋणनिर्देश

आता 'सभे'च्या परिभाषेत आभार मानण्याचे शेवटचे 'गोड' काम तेवढे राहिले. सर्वांत पहिले आणि मनापासून आभार मानावयाचे म्हणजे ज्येष्ठ इतिहास संशोधक श्री. स. मा. गर्गे आणि त्यांचे स्नेही श्रीमंत सरदार आंग्रे साहेब यांचे. श्री. गर्गे यांनी हा ग्रंथ लिहिला जात असता वेळोवेळी उत्तेजन दिले, पुस्तके पुरवली, ग्रंथाचे हस्तलिखित साक्षेपाने तपासले, इतकेच नव्हे, तर ते श्रीमंत आंग्रेसाहेबांना वाचण्यास दिले; त्यांच्याही पसंतीला ते उतरले. श्रीमंत राजमाता श्रीमती विजयाराजे शिंदे आणि श्रीमंत आंग्रेसाहेब यांच्या सौजन्यपूर्ण सहकार्याचे ऋण मानावे तेवढे थोडेच. त्यांचे सहकार्य लाभले नसते तर त्या बिचाऱ्या तुळाजीला ज्याप्रमाणे त्याच्या कोठडीत कधी सूर्याचा प्रकाश दिसला नाही, त्याप्रमाणे तुळाजीवरच्या ह्या ग्रंथालाही बहुधा कधी 'प्रकाश' दिसला नसता. श्रीमंत आंग्रे सरकारांचे हे औदार्य सर्वस्वी निरपेक्ष आहे, म्हणजे ग्रंथकाराच्या विचार स्वातंत्र्यावर किंवा अभिव्यक्तीस्वातंत्र्यावर कोणतेही बंधन घालण्याची अपेक्षा त्यांनी दूरान्वयाने सुद्धा व्यक्त केलेली नाही, हे येथे मुद्दाम सांगितले पाहिजे. श्री. स. मा. गर्गे

आणि श्रीमंत आंग्रे सरकार यांचा मी अत्यंत आभारी आहे.

माझे चाळिसगाव कॉलेजातले जुने स्नेही प्रा. डॉ. व्ही. पी. पुराणिक यांनी 'अभिनव ज्ञानकोशा' तील रामाजी महादेवाची माहिती लिहून पाठविली. प्रा. प्र. के. घाणेकर यांनी आपल्या जवळचा डॉ. आपटे यांचा 'Maratha Navy and Merchantship' हा दुर्मिळ ग्रंथ अभ्यासासाठी दिला. चि. सुधीर पुराणिक यांनी 'कुलाबकर आंग्रे' हा बृहद्ग्रंथ, जे. एस्. एस्. कॉलेज अलिबाग, या संस्थेच्या ग्रंथालयातून श्री. साबणे यांच्या मध्यस्थीने, झेरॉक्स करून मला दिला व प. रा. दाते यांचे 'कान्होजी आंग्रे' यांचे चरित्र व 'रायगड व ठाणे जिल्हा गॅझेटियर्स' मिळवून दिले; याबद्दल या सर्वांचा मी ऋणी आहे. ज्या ग्रंथकारांच्या ग्रंथांचा मी उपयोग केला त्यांचे ऋण तर मोठेच आहे. सौ. शशिकला उपाध्ये यांनी हा ग्रंथ देखण्या स्वरूपात आणि शुद्धलेखनाबद्दल काटेकोर दक्षता बाळगून प्रकाशित केला याबद्दल त्यांचेही आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

## एक विलक्षण अनुभव

शेवटी, या ग्रंथाबद्दल एक विलक्षण अनुभव सांगण्यासारखा आहे. हा ग्रंथ मी लिहिला हे जितके खरे आहे, तितकेच हा ग्रंथ मी लिहिलेला नाही, हे ही खरेच आहे. हा ग्रंथ माझ्याकडून 'लिहविला' गेला. ती कदाचित् तुळाजीच्या आत्म्याची प्रेरणाही असेल. अन्यथा इतक्या वर्षांनंतर आणि इतक्या अभ्यासकांत, तुळाजीचा अभ्यास करण्याची आणि त्याच्यावर ग्रंथ लिहिण्याची प्रेरणा मलाच का व्हावी - या कोड्याची उपपत्ती लागत नाही. अंधश्रद्धानिर्मूलनाचे कंकण बांधलेल्या विचारवंतांना कदाचित् ही भाबडी अंधश्रद्धाही वाटणे अगदी शक्य आहे. ते कसेही असो; आहे ही वस्तुस्थिती अशी आहे. आता हा ग्रंथ लिहून झाला आहे आणि प्रकाशितही होत आहे. तेव्हा न्यायासाठी तीनशे वर्षे तळमळणाऱ्या तुळाजीच्या आत्म्याला आता शांती मिळाली असेल, अशी मी आशा करतो, आणि शेक्सपिअरच्या हॅम्लेटच्या शब्दांत त्याचा निरोप घेतो, की, 'त्रस्त समंधा, शांत हो!'

३६, न्यू आनंदनगर,
तळेगाव दाभाडे, ४१०५१६.

– श. श्री. पुराणिक

# अनुक्रमणिका

१ / कान्होजी आंग्रे / ११
२ / सेखोजी आंग्रे / ७६
३ / संभाजी आंग्रे / ९३
४ / तुळाजी आंग्रे : पूर्वरंग / १६८
५ / तुळाजी आंग्रे : उत्तररंग / २४१
६ / तुळाजी आंग्रे : परिसमाप्ती / ३१६

# १ / कान्होजी आंग्रे

**कोकणातले आंग्रे मूळ देशावरचे !**

पुणे जिल्ह्यातले पुण्यापासून सहा मैलांवर असलेल्या काळोसे या गावातील आंगरवाडी हे आंग्र्यांचे मूळ गाव. आंगरवाड्या दोन आहेत. एक पुण्याजवळील काळोसे गावातील आंगरवाडी आणि दुसरी कोकणातील हर्णैजवळची आंगरवाडी. आंग्र्यांचे सारे आयुष्य कोकणात गेले असल्यामुळे ही कोकणातली आंगरवाडी हेच आंग्र्यांचे मूळ गाव असावे असे मत होणे साहजिक आहे, पण त्या मताला आधार नाही. पुरावा आहे तो नेमका उलट आहे आणि तो खुद्द आंग्र्यांच्याच हातच्या अस्सल कागदपत्रांचा आहे. चाकणचे कडू व काळोसे गावचे आंग्रे हे वतनभाऊ. या कडूंकडून कान्होजी आंग्रे याने सुपे चाकणचे निम्मे वतन शके १६४६ च्या चैत्रात साठ हजार रुपयांस खरेदी केले. या पुराव्याप्रमाणेच कान्होजी आंग्रे याचा नातू मानाजी आंग्रे याने (कार्तिक शुद्ध पंचमी शके १७२२) २२ ऑक्टोबर १८०० रोजी वेदमूर्ती काण्णव यांस लेख करून दिलेला आहे. त्याच्या शेवटी आडनाव आंग्रे, गाव काळोसे, प्रांत पुणे, मुक्काम काळोसे असा स्पष्ट निर्देश केलेला आहे. यावरून पुणे जिल्ह्यातले आंगरवाडी हेच आंग्र्यांचे मूळ वतन किंवा जन्मगाव असल्याचे सिद्ध होते.[१]

आंग्र्यांचे घराणे हे अस्सल क्षत्रियांचे शहाण्णव कुळी आहे. मराठे लोकांत शहाण्णव कुळे आहेत. त्यांपैकी शकपाळ हे आंगऱ्यांचे कुळ किंवा आडनाव होय. शकपाळ हे नाव शंकपाळ किंवा संकपाळ असेही लिहिले जाते. यांचे कुलदैवत पुण्यातील जोगेश्वरी व अलिबाग किल्ल्यांतील श्री काळंबिका देवी होय. यांचे शस्त्र म्हणजे खांडा म्हणजे लांब तलवार. यांचे सिंहासन, निशाण व घोडा ही सर्व तांबडी असतात. यांचा झेंडा भगवा आणि ढालही भगवीच असते. यांच्या सोयरिकी जाधव, भोसले, दाभाडे, गायकवाड अशा अस्सल मराठ्यांशी होतात.[२]

# संदर्भ

## १ / कान्होजी आंग्रे

१) कुलाबकर आंग्रे - ढबू - कान्होजी आंग्रे - पृ. ७-८, तळटीप
२) कुलाबकर आंग्रे - ढबू - पूर्वपीठिका, पृ. ४-५
३) कुलाबकर आंग्रे - ढबू पूर्वपीठिका, पृ. ४-५
४) दर्यासारंग कान्होजी आंग्रे यांचे चरित्र - प. रा. दाते - पृ. ८
५) उक्त - पृ. ८ ते ११
६) कान्होजी आंग्रे - मनोहर माळगावकर, पृ. २३-२४
७) कान्होजी आंग्रे चरित्र - प. रा. दाते - पृ. ११
८) कान्होजी आंग्रे - मनोहर माळगावकर, पृ. २३-२४
९) उक्त - पृ. ५५-५६
१०) उक्त - पृ. ६३-६६
११) मराठी रियासत - उग्र प्रकृति - संभाजी, पृ. ८९-९०
१२) कान्होजी आंग्रे - मनोहर माळगावकर, पृ. ११७-१२०
१३) उक्त - पृ. ९७-९८
१४) कुलाबकर आंग्रे - ढबू पूर्वपीठिका, पृ. १२
१५) उक्त - पृ. १२
१६) कान्होजी आंग्रे - मनोहर माळगावकर, पृ. ८३
१७) उक्त - पृ. ९८
१८) उक्त - पृ. ९९
१९) उक्त - पृ. ११७
२०) उक्त - पृ. ११७
२१) उक्त - पृ. १२१
२२) उक्त - पृ. १२१-१२२
२३) उक्त - पृ. १४६

२४) उक्त - पृ. १४६
२५) उक्त - पृ. १४८
२६) कुलाबकर आंग्रे - ढबू - पृ. १४
२७) कान्होजी आंग्रे - मनोहर माळगावकर, पृ. ९४-९५
२८) उक्त - पृ. १२१
२९) मराठी रियासत - बाळाजी विश्वनाथ, पृ. ९२
३०) कुलाबकर आंग्रे - कान्होजी आंग्रे, पृ. १५
३१) कान्होजी आंग्रे - मनोहर माळगावकर, पृ. १९१-१९३
३२) कान्होजी आंग्रे चरित्र - प. रा. दाते - पृ. १४-१५
३३) कान्होजी आंग्रे - मनोहर माळगावकर, पृ. १९५
मराठी रियासत - बाळाजी विश्वनाथ, पृ. १०५
३४) कान्होजी आंग्रे - मनोहर माळगावकर, पृ. १९९-२०१
३५) उक्त - पृ. २१३-२१८
३६) उक्त - पृ. २४७-२५८
मराठी रियासत - बाळाजी विश्वनाथ, पृ. १०८-१०९
३७) कान्होजी आंग्रे - मनोहर माळगावकर, पृ. २८४
३८) उक्त - पृ. २२४-२३१
मराठी रियासत - बाळाजी विश्वनाथ, पृ. १०८
३९) मराठी रियासत - बाळाजी विश्वनाथ, पृ. १०९-११०
कान्होजी आंग्रे - मनोहर माळगावकर, पृ. २५८-२७७
४०) उक्त - पृ. २९६
४१) उक्त - पृ. २११
४२) उक्त - पृ. २०६
४३) मराठे व इंग्रज - न. चिं. केळकर, पृ. ३१-३३
४४) कान्होजी आंग्रे - मनोहर माळगावकर, पृ. १७०
४५) मराठे व इंग्रज - न. चिं. केळकर, पृ. ३२-३३
४६) कुलाबकर आंग्रे - समालोचन - पृ. ३६
४७) मराठी रियासत - बाळाजी विश्वनाथ, पृ. १०७-१०८
४८) कान्होजी आंग्रे - मनोहर माळगावकर, पृ. १८१
४९) मराठे व इंग्रज - न. चिं. केळकर, पृ. २१८
५०) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. १४०
५१) उक्त - पृ. १४०
५२) उक्त - पृ. १४१

५३) उक्त - पृ. १४१
५४) उक्त - पृ. १४३
५५) मराठी रियासत - बाळाजी विश्वनाथ, पृ. १०५
५६) मराठे व इंग्रज - न. चिं. केळकर, पृ. ३२-२१७
५७) कुलाबकर आंग्रे - कान्होजी आंग्रे, पृ. ३५-३६
५८) मराठे व इंग्रज - न. चिं. केळकर, पृ. २१८
५९) उक्त - पृ. २१९
६०) आज्ञापत्र - सं. प्र. न. जोशी, पृ. २७/२८, ४४-४९
६१) मराठे व इंग्रज - न. चिं. केळकर, पृ. २१७
६२) उक्त - पृ. २१६
६३) अहकामे आलमगिरी - सेतुमाधवराव पगडी - पृ. १०-११
६४) कान्होजी आंग्रे - मनोहर माळगावकर, पृ. १३६
६५) उक्त - पृ. १३६
६६) मराठी रियासत - बाळाजी विश्वनाथ, पृ. ११०
६७) कान्होजी आंग्रे - मनोहर माळगावकर, पृ. १३७
६८) कुलावकर आंग्रे - कान्होजी आंग्रे - पृ. ४६-४७
६९) कुलाबकर आंग्रे - कान्होजी आंग्रे - पृ. १६
७०) कान्होजी आंग्रे - मनोहर माळगावकर, पृ. १३६
७१) कुलाबकर आंग्रे - ढबू ·· कान्होजी आंग्रे - पृ. १८
७२) उक्त - पृ. ५९
७३) उक्त - पृ. १८
७४) करवीर रियासत - स. मा. गर्गे
७५) कुलाबकर आंग्रे - पृ. १९ (तळटीप)
७६) उक्त - पृ. ६०
७७) कुलावकर आंग्रे - आंग्रे शकावली - पृ. १७
७८) उक्त - पृ. ५५
७९) कान्होजी ,आंग्रे चरित्र - प. रा. दाते, पृ. ४०
८०) उक्त - पृ. ४०
८१) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. १४१
८२) उक्त - पृ. १४२
८३) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. २१३-२१४
८४) उक्त - पृ. २१४-२१५
८५) कुलाबकर आंग्रे - पृ. २८

८६) ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र व पत्र व्यवहार, पृ. ३२
८७) उक्त - पृ. ३३
८८) ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र व पत्र व्यवहार - द. ब. पारसनीस, पृ. २०४
८९) उक्त - पृ. २९-३१
९०) कान्होजी आंग्रे - मनोहर माळगावकर, पृ. २९५-२९६
कुलाबकर आंग्रे - कान्होजी आंग्रे - पृ. ४६-४७
९१) कुलाबकर आंग्रे - आंग्रे शकावली - पृ. २१

■ ■

## २ / सेखोजी आंग्रे

१) स्वामी दरियाचे - भा. वा. आठवले, पृ. २०८
२) कुलाबकर आंग्रे - (कान्होजी आंग्रे) ढबू, पृ. १७, पृ. ३८
३) कुलाबकर आंग्रे - (सेखोजी आंग्रे) पृ. ६३-६५
४) कुलाबकर आंग्रे - (सेखोजी आंग्रे) पृ. ६७
५) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, गो. स. सरदेसाई, पृ. २२०
६) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, गो. स. सरदेसाई, पृ. २२५
७) पेशवे दप्तर - खंड ३ / ले. ४८, पे.द. - खंड ३ / ले. १५
८) कुलाबकर आंग्रे - सेखोजी आंग्रे, पृ. ७०
९) पेशवे दप्तर - खंड ३ / ले. ७१
१०) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, गो. स. सरदेसाई, पृ. २२४
११) पेशवे दप्तर - खंड ३३ / ले. ४२
१२) पेशवे दप्तर - खंड ३३ / ले. ४३
१३) पेशवे दप्तर - खंड ३ / ले. ४३
१४) कुलाबकर आंग्रे - पृ. ७५
१५) पेशवे दप्तर - खंड ३ / ले. ७१
१६) कुलाबकर आंग्रे - पृ. ८८
१७) कुलाबकर आंग्रे - कान्होजी आंग्रे - पृ. २८-२९
१८) कुलाबकर आंग्रे - सेखोजी आंग्रे - पृ. ८१
१९) कुलाबकर आंग्रे - सेखोजी आंग्रे - पृ. ७४
२०) पेशवे दप्तर - खंड ३ / ले. ७०, ७२, ७५, ७८
२१) कुलाबकर आंग्रे - पृ. ८८

■ ■

## ३ / संभाजी आंग्रे


१) कुलाबकर आंग्रे - ढबू - सेखोजी आंग्रे, पृ. ८२
२) पेशवे दप्तर - खंड ३ - क्र. ५६
३) पेशवे दप्तर - खंड ३३ - क्र. ८०
४) पेशवे दप्तर - खंड ३३ - क्र. २९
५) पेशवे दप्तत - खंड ३ - क्र. ७५
६) आंगरेकालीन अष्टागर - शां. वि. आवळसकर - प्रस्तावना, पृ. १८-२२, रायगड जिल्हा गॅझेटियर, पृ. ७६०
७) कुलाबकर आंग्रे - ढबू, पृ. ११५
८) पेशवे दप्तर - खंड ३३ - क्र. ९९
९) मराठी रियासत - सरदेसाई - पेशवा बाजीराव, पृ. २०-२१
१०) पेशवे दप्तर - खंड ३ - क्र. ९१
११) पेशवे दप्तर - खंड ३३ - क्र. १०६
१२) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ४४१
१३) मराठी रियासत - मध्य विभाग १, पृ. ३९५, ४०४, ४१८
१४) कुलाबकर आंग्रे, पृ. १०३
१५) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ३८३
१६) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ.२२८
१७) कुलाबकर आंग्रे, पृ. ९१, ९२
१८) कुलाबकर आंग्रे, पृ. १०३
१९) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ३८३
२०) पेशवे दप्तर - खंड ३३ - क्र. १८२
२१) पेशवे दप्तर - खंड ३३ - क्र. १८४
२२) पेशवे दप्तर - खंड ३३ - क्र. २३०
२३) कुलाबकर आंग्रे, पृ. ९८
२४) कुलाबकर आंग्रे, पृ. १०१
२५) कुलाबकर आंग्रे - शकावली, पृ. ६२
२६) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ३८४
२७) कुलाबकर आंग्रे, पृ. १०६
२८) कुलाबकर आंग्रे, पृ. १०८-१०९
२९) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. १५१
३०) सह्याद्री - बाजीराव अंक, पृ. ३९८

३१) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ३८५
३२) राजवाडे खंड २, पृ७१-७२, आंग्रे शकावली, पृ. ६७
३३) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ३८५
३४) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ३८५
३५) शेजवलकर लेखसंग्रह, पृ. १६८
३६) कुलाबकर आंग्रे, पृ. ७४
३७) कुलाबकर आंग्रे, पृ. ९६
३८) पेशवे दप्तर - खंड ११ - क्र. २३
३९) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ३६५, ३६६
४०) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ३६४
४१) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. १८९
४२) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २००
४३) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. १९०
४४) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. १९५
४५) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. १९२
४६) इतिहास - मंजरी - द. वि. आपटे, पृ. १५३
४७) एक्याण्णव कलमी बखर
४८) स्थिरबुद्धि राजाराम - पृ.४७
४९) पोतदार गौरव ग्रंथ - प्रतापगडची भवानी - शां. वि. आवळसकर
५०) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ३३३-३३४
५१) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ११०
५२) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ३६५
५३) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. १९८
५४) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ३६४-३६५
५५) निजाम - पेशवे संबंध, पृ. १४९
५६) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २०४
५७) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ३६५
५८) कुलाबकर आंग्रे, पृ. ९३
५९) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. १४२
६०) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. २१९
६१) पोर्तुगेज - मराठे संबंध, पृ. १५०
६२) निजाम - पेशवे संबंध, पृ. ३८
६३) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ४२७

६४) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ३८६, ३८७, ३९०, ३९१
६५) मराठी रियासत - मध्य विभाग २, पृ. ४३९
६६) पोर्तुगेज - मराठे संबंध, पृ. १५१
६७) पेशवे दप्तर - खंड ३३ - क्र. ४३७
६८) कुलाबकर आंग्रे - आंग्रे शकावली, पृ. ७५
६९) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ३०५-३८६
७०) पेशवे दप्तर - खंड ३३ - क्र. ४०१
७१) पेशवे दप्तर - खंड १२ - क्र. ९
७२) पेशवे दप्तर - खंड १२ - क्र. ३९
७३) कुलाबकर आंग्रे, पृ. १२३, १२४
७४) ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र व पत्र व्यवहार लेखांक ३१२
७५) कुलाबकर आंग्रे, पृ. ११८-११९
७६) ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र व पत्र व्यवहार पृ. २९२, लेखांक ३१४
७७) ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र व पत्र व्यवहार पृ. ३०१-३०२, लेखांक ३२६-३२७
७८) कुलावकर आंग्रे, पृ. १३३
७९) कुलाबकर आंग्रे, पृ. १२८
८०) भारत इतिहास संशोइक मंडळ त्रैमासिक वर्ष २२ / अंक १
८१) पोर्तुगेज - मराठे संबंध, पृ. १५४
८२) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ३६७
८३) कुलाबकर आंग्रे - समालोचना, पृ. ६१-६२
८४) ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र व पत्र व्यवहार लेखांक १६९
८५) पोर्तुगेज - मराठे संवंध - पिसुर्लेकर, पृ. २११
८६) पेशवे दप्तर - खंड ३ - क्र. १६७
८७) पेशवे दप्तर - खंड ३३ - क्र. ४०१
८८) पेशवे दप्तर - खंड ३ - क्र. १७४
८९) कुलाबकर आंग्रे - समालोचना, पृ. ७१-७२
९०) पोर्तुगेज - मराठे संबंध, पृ. २०४
९१) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ३८७
९२) कुलाबकर आंग्रे - समालोचन, पृ. ४०-४१
९३) कुलाबकर आंग्रे - समालोचन, पृ. ६८-६९
९४) पेशवे दप्तर - खंड ३३ - क्र. ४१४
९५) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ३८९
९६) मराठी रियासत - पेशवा बाजीराव, पृ. ३६७

९७) पोर्तुगेज - मराठे संबंध, पृ. २०२-२०४
९८) असा हा महाराष्ट्र भाग १, पृ. १०
९९) मराठी रियासत - मध्य विभाग २, पृ. ४३८-४३९
१००) कुलाबकर आंग्रे - समालोचन, पृ. ८७-८९
१०१) मराठी रियासत - मध्य विभाग २, पृ. ४३६
१०२) मराठी रियासत - मध्य विभाग २, पृ. ४३६-४३७
१०३) इतिहास संग्रह पुस्तक २, पृ. १७-१८
१०४) इतिहासातील सहली भाग - २, पृ. २८२
१०५) कुलाबकर आंग्रे - समालोचना पृ. ४३-४४
१०६) कुलाबकर आंग्रे - समालोचना, पृ. ५५
१०७) कुलाबकर आंग्रे - समालोचना, पृ. ६१
१०८) कुलाबकर आंग्रे
१०९) पेशवे दप्तर - खंड ३३ - क्र. ४५६
११०) कुलाबकर आंग्रे - पृ. १२४
१११) कुलाबकर आंग्रे - पृ. ११५
११२) कुलाबकर आंग्रे - पृ. ११५

■ ■

४ / तुळाजी आंग्रे : पूर्वरंग

१) कुलाबकर आंग्रे - ढबू - सेखोजी आंग्रे पृ. ६१
२) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४३९
३) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४३७. ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र व पत्रव्यवहार - ले. ३२५
४) कुलाबकर आंग्रे - पृ. १४२, १४३
५) कुलाबकर आंग्रे - पृ. ११९
६) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. ९१-९२
७) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४३८
८) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. ३९
९) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४३८
१०) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. ९४-९५
११) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. ९२
१२) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. ९३-९४

१३) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. ९५-९६
१४) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. ९५
१५) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. ९९
१६) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. १००
१७) वैद्य दप्तर - खंड ५, पृष्ठ ५, क्र. ६
१८) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. १००
१९) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. १५
२०) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. १०१-१०२
२१) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. २१७
२२) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. ७७
२३) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. २०
२४) कुलाबकर आंग्रे - तुळाजी आंग्रे - पृ. १७४
२५) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २३४
२६) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. ३०
२७) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. २७
२८) ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र व पत्रव्यवहार - कुलाबकर आंग्रे - ले. १११, पृ. १७७
२९) कुलाबकर आंग्रे - पृ. १६७
३०) कुलाबकर आंग्रे - पृ. १७९
३१) ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र व पत्रव्यवहार - ले. १२६
३२) कुलाबकर आंग्रे - पृ. १७८
३३) कुलाबकर आंग्रे - पृ. १७८-१७९
३४) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. २१७
३५) कुलाबकर आंग्रे - पृ. १८१
३६) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २३४
३७) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. ४
३८) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. २७
३९) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. २७
४०) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. २७
४१) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. ४६
४२) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. ५०
४३) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. ५६
४४) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४३९
४५) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २४३

४६) कुलाबकर आंग्रे - सेखोजी आंग्रे - पृ. ७२
४७) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. १७३
४८) कुलाबकर आंग्रे - पृ. १८४
४९) मराठे व इंग्रज - प्रस्तावना - पृ. १८
५०) कुलाबकर आंग्रे - पृ. ३२०
५१) कुलाबकर आंग्रे - पृ. ३४२, ३४३
५२) कुलाबकर आंग्रे - पृ. ४४४
५३) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. ४६
५४) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. २७
५५) कुलाबकर आंग्रे - पृ. १८७
५६) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४३९
५७) कुलाबकर आंग्रे - पृ. ४२९
५८) कुलाबकर आंग्रे - पृ. १८४
५९) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४३२
६०) कुलाबकर आंग्रे - पृ. ३४९
६१) कुलाबकर आंग्रे - पृ. ४४४
६२) कुलाबकर आंग्रे - पृ. १८४-१८७
६३) वैद्य दप्तर - खंड ५, क्र. ३४
६४) वैद्य दप्तर - खंड ५, क्र. १७
६५) वैद्य दप्तर - खंड ५, क्र. १२
६६) कुलाबकर आंग्रे - पृ. १६
६७) कुलाबकर आंग्रे - पृ. ३७७
६८) कुलाबकर आंग्रे - पृ. ३८२-३८३
६९) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २०८-२०९
७०) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४३२
७१) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. ७७
७२) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. ४१
७३) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. ७८
७४) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. २१७
७५) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. २५
७६) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. २०
७७) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. ८३
७८) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. ८४

७९) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. ८८
८०) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. ८५
८१) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. २२६-२२७
८२) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. ३९
८३) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २१५-२१६
८४) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २३७
८५) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २३६-२३७
८६) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २३७
८७) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. १०४
८८) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. १०४-१०५
८९) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. ३८६
९०) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. १०२-१०३
९१) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. २३८
९२) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. २२८
९३) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. २३१-२३२
९४) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. १०७-१०८
९५) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. ४०५-४०७
९६) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४३२
९७) मराठे व इंग्रज - पृ. २१९-२२०
९८) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४३२

■ ■

## ५ / तुळाजी आंग्रे : उत्तर रंग

१) सुभे कल्याण - विवेकानंद गोडबोले - पृ. ११६-१२०, १२७-१२९, १५८-१६४, १७६-१८१
२) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४४६
३) मराठी रियासत - पेशवा बाजीरा पृ. २३७
४) मराठे व इंग्रज - प्रस्तावना - पृ. १८
५) काव्येतिहास संग्रह - पृ. १७९
६) मराठी रियासत - मध्य विभाग ४ पृ. १४४-१४५
७) मुलांचा महाराष्ट्र - गो. कृ. मोडक - परिशिष्ट पृ. १२-१३
८) चरित्रचंद्र - ल. रा. पांगारकर - (मोरोपंत चरित्र व त्याचे टीकाकार)

९) Vs चे मार्मिक लेख - द्वितीय गुच्छ - धुंडिराज सदाशिव जोशी - पृ. २६-२९
१०) सुभे कल्याण - विवेकानंद गोडबोले - पृ. १६७
११) मराठी रियासत - मध्य विभाग ३ पृ. ४४६
१२) सुभे कल्याण - विवेकानंद गोडबोले - पृ. १६५
कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. ८५-८६
१३) सुभे कल्याण - विवेकानंद गोडबोले - पृ. १६५
कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. ८७
१४) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. १८२
१५) मराठी रियासत - मध्य विभाग ३ पृ. ४४७-४४८
१६) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४४७-४४८
१७) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४४७-४४८
१८) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. १८३
१९) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. १९४-१९५
२०) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४४३-४४५
२१) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. ११३
२२) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४५०
२३) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. २०६
२४) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४५१
२५) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४५२
२६) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. १२५
२७) कुलाबकर आंग्रे - आंग्रे शकावली, पृ. १०९
२८) सुभे कल्याण - विवेकानंद गोडबोले - पृ. १७१
२९) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४५२
३०) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. ११५
३१) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४४६
३२) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २४३
३३) कुलाबकर आंग्रे - पृ. १८८
३४) कुलाबकर आंग्रे - पृ. १८५
३५) कुलाबकर आंग्रे - पृ. १९३
३६) मराठ्यांच्या इतिहासाची साधने - सं. शं. देसाई, आशिया खंड -
पोर्तुगेज मराठे संबंध - पृ. १४८-१४९
३७) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २४०-२४१
३८) कुलाबकर आंग्रे - पृ. १८८-१८९

३९) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २४१ (तळटीप)
४०) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. १०९
४१) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. १४२
४२) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. १२१
४३) सुभे कल्याण - विवेकानंद गोडबोले - पृ. १७२
४४) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. १४२
४५) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. १४१
४६) पोर्तुगेज - मराठे संबंध - स. शं. देसाई, पृ. १४९, १५०
४७) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २४३
४८) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४५६
४९) कुलाबकर आंग्रे - पृ. १८६
५०) कुलाबकर आंग्रे - पृ. १८६
५१) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. १५६
५२) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. १७५
५३) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४५३-४५४
५४) कुलाबकर आंग्रे - पृ. १९४
५५) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. १६४
५६) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. १६४
५७) कुलाबकर आंग्रे - पृ. २१३-२१४
५८) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. १५९
५९) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. ११६
६०) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४६४
६१) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. ११५
६२) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४६२-४६३
६३) कुलाबकर आंग्रे - पृ. २१५
६४) कुलाबकर आंग्रे - पृ. २०२
६५) कुलाबकर आंग्रे - पृ. २०२
६६) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. ११६
६७) कुलाबकर आंग्रे - पृ. १९७-१९८
६८) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. ११६-११७
६९) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. १६८
७०) कुलाबकर आंग्रे - समालोचना - पृ. ११८
७१) कुलाबकर आंग्रे - पृ. १९९

७२) कुलाबकर आंग्रे - पृ. २०१
७३) कुलाबकर आंग्रे - पृ. २००
७४) कुलाबकर आंग्रे - पृ. २००
७५) कुलाबकर आंग्रे - पृ. २०२
७६) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४५९-४६०
७७) कुलाबकर आंग्रे - आंग्रे शकावली, पृ. ११६
७८) कुलाबकर आंग्रे - पृ. २०३-२०४
७९) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. १६१
८०) कुलाबकर आंग्रे - पृ. ३७६

■ ■

## ६ / तुळाजी आंग्रे : परिसमाप्ती

१) मराठी रियासत - मध्य विभाग ३ पृ. २४२, २४५
२) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. २६८, पृ. २७०
३) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४३९
४) कुलाबकर आंग्रे - पृ. २१६
५) कुलाबकर आंग्रे - पृ. २१७
६) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २५२ ( तळटीप )
७) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २५२
८) मराठी रियासत - मध्य विभाग ३ पृ. २३५-२३६
९) थोरले माधवराव रोजनिशी-वाड - पृ. ११४
१०) थोरले माधवराव रोजनिशी - पृ. ११५
११) थोरले माधवराव रोजनिशी-वाड - पृ. १९०-१९२
१२) थोरले माधवराव रोजनिशी-वाड - पृ. १२१
१३) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. २७१, पृ. २७२
१४) कुलाबकर आंग्रे - पृ. २२७
१५) थोरले माधवराव रोजनिशी - पृ. २२४
१६) थोरले माधवराव रोजनिशी - पृ. १२१
१७) मराठी रियासत - मध्य विभाग ४ पृ. १८१
१८) कुलाबकर आंग्रे - पृ. २२७
१९) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २४२
२०) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २८६

२१) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. २७२, पृ. २७३
२२) थोरले माधवराव रोजनिशी - पृ. ११६
२३) कुलाबकर आंग्रे - आंग्रे शकावली, पृ. १३१
२४) मराठी रियासत - उत्तर विभाग १, पृ. ८१
२५) सवाई माधवराव - रोजनिशी खंड १, पृ. १६०-१६४
२६) कुलाबकर आंग्रे - आंग्रे शकावली, पृ. १३२
२७) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४७१
२८) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. १९७
२९) पेशवे दप्तर - खंड २४ क्र. १९८
३०) कुलाबकर आंग्रे - आंग्रे शकावली, पृ. १२४-१२५
३१) सुभे कल्याण - पृ. १७६
३२) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४७७
३३) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४६८
३४) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४६९
३५) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४६९
३६) सुभे कल्याण - पृ. १८७-१८९
३७) मराठे व इंग्रज - पृ. २२०-२२२
३८) मराठी रियासत - मध्य विभाग ३ पृ. ४६५
३९) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४६५
४०) शेजवलकर लेखसंग्रह - पृ. ३९-४०
४१) पोर्तुगेज - मराठे संबंध - पृ. ३२६
४२) मराठी रियासत - मध्य विभाग ३ पृ. ४६७
४३) Maratha Navy and Merchantship - Dr. B. K. Apte - P.P. 82-83
४४) Maratha Navy and Merchantship - Dr. B. K. Apte - P.P. 82
४५) मराठी रियासत - पेशवा बाजीराव - पृ. ३८५-३८६
४६) मराठी रियासत - पेशवा बाजीराव - पृ. ३८६
४७) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २५२
४८) नानासाहेब पेशव्याचे चरित्र - पृ. २१४
४९) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४३५, ४३६, ४३९
५०) मराठी रियासत - मध्य विभाग २ पृ. ४३५, ४३६, ४३९
५१) मराठे व इंग्रज - प्रस्तावना - पृ. १८
५२) कुलाबकर आंग्रे - पृ. १८३
५३) कुलाबकर आंग्रे - पृ. १८३

५४) Maratha Navy and Merchantship - Dr. B. K. Apte - P.P. 82-83
५५) कुलाबकर आंग्रे - पृ. २२८
५६) ऐतिहासिक प्रस्तावना - पृ. १८३, १८४, १९१.
५७) पोर्तुगेज - मराठे संबंध - पिसुर्लेकर, पृ. २४४
५८) शेजवलकर लेखसंग्रह - पृ. १६७
५९) कुलाबकर आंग्रे - पृ. २२३

■ ■

## साभार ऋणनिर्देश

मराठी रियासत - गो. स. सरदेसाई
१) स्थिरबुद्धी राजाराम
२) पुण्यश्लोक शाहू - बाळाजी विश्वनाथ
३) पेशवा बाजीराव
४) मध्य विभाग - २ पेशवा नानासाहेब
५) मध्य विभाग - ३ पानिपत प्रकरण
६) मध्य विभाग - ४ थोरला बाजीराव
२) पेशवे दप्तर
७) खंड ३ - जंजिरा प्रकरण
८) खंड ३३ - जंजिरा प्रकरण
९) खंड २४ - पेशव्यांच्या पश्चिम किनाऱ्यावरील हालचाली
१०) कुलाबकर आंग्रे - दा. गो. ढबू
११) Maratha Navy and Merchantship - Dr. B. K. Apte
१२) पोर्तुगेज - मराठे संबंध - प्रो. पांडुरंग पिसुर्लेकर
१३) मराठ्यांच्या इतिहासाची साधने - आशिया खंड - पोर्तुगेज - मराठे संबंध - स. शं. देसाई
१४) वैद्य दप्तर - खंड ५ - श. ल. वैद्य
१५) सुभे कल्याण - विवेकानंद गोडबोले
१६) कान्होजी आंग्रे चरित्र - प. रा. दाते
१७) कान्होजी आंग्रे चरित्र - गो. ना. परदेशी
१८) कान्होजी आंग्रे - मनोहर माळगावकर
१९) नानासाहेब पेशवे चरित्र - गो. स. सरदेसाई
२०) शेजवलकर लेखसंग्रह - त्र्य. शं. शेजवलकर - संपादक ह. वि. मोटे

२१) ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र व पत्रव्यवहार - द. ब. पारसनीस
२२) ऐतिहासिक प्रस्तावना - वि. का. राजवाडे
२३) ब्रिटिश रियासत - पूर्वाध - गो. स. सरदेसाई
२४) जलदुर्गाच्या सहवासात - प्र. के. घाणेकर
२५) महाराष्ट्राची धारातीर्थे - महादेवशास्त्री जोशी
२६) दुर्गभ्रमण गाथा - गो. नी. दांडेकर
२७) किल्ले - गो. नी. दांडेकर
२८) V.S.चे मार्मिक लेख - धुं. गो. जोशी
२९) शककर्ता शिवाजी - गो. स. सरदेसाई
३०) उग्रप्रकृती संभाजी - गो. स. सरदेसाई
३१) आज्ञापत्र - रामचंद्रपंत अमात्य संपादक - प्र. न. जोशी
३२) निजाम - पेशवे संबंध - त्र्य. शं. शेजवलकर
३३) काव्येतिहास संग्रह - का. ना. साने
३४) रायगड जिल्हा गॅझेटियर
३५) पेशवा रोजनिशी - बाळाजी बाजीराव
३६) पेशवा रोजनिशी - माधवराव
३७) पेशवा रोजनिशी - सवाई माधवराव
३८) मराठ्यांचा इतिहास - स. मा. गर्गे, अ. रा. कुलकर्णी व ग. ह. खरे
३९) मुलांचा महाराष्ट्र - गो. कृ. मोडक
४०) चरित्रचंद्र - ल. रा. पांगारकर
४१) निवडक लेख - भाग १ ग. ह. खरे
४२) स्वामी दरियाचे - डॉ. भा. वा. आठवले
४३) साद सह्याद्रीची, भटकंती किल्ल्यांची - प्र. के. घाणेकर

■ ■ ■